# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/०६/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या गावठी मोहाफुल दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २४/०६/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम मोटरसायकलवर अवैधरीत्या गावठी मोहाफुल दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफने सावनेर येथील दुधबर्डी शिवार तेलकामठी रोड सावनेर येथे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— सूर्यपाल चंद्रपाल राजपूत, वय २७ वर्ष, रा. तिडंगी ता. कळमेश्वर** याने आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र. एम एच— ४०/ए. झेड— ५१६० वर पांढऱ्या रंगाच्या बोरी मध्ये काळया टयुबमध्ये अंदाजे ६० लीटर गावठी मोहाफुल दारू किंमती ६०००/— रू चा मुद्देमाल अवैद्यरीत्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीकडुन असा एकुण वाहनासह ४६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ) म.दा.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि. रविंद्र मानकर पोहवा सुरेंद्र वासनिक, पोशि अंकुश मुळे, अशोक निस्ताने यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर